# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

दूरध्वनी क्र. ०२४०-२४०३१०७

ई-मेलः election@bamu.ac.in, registrar@bamu.ac.in


## विद्यापीठ निवडणूक- २०२२

## जाहीर सूचना

### 'विद्यापरिषद-अध्यापक-' गटाचे आरक्षण सोडतीद्वारे निश्चित करण्याबाबत

सर्व संबंधितांना जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, 'विद्यापरिषद- अध्यापक' गटाचे आरक्षण सोडतीद्वारे निश्चित करण्यासंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३२(३)(छ) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

**कलम ३२(३)(छ)- अध्यापक गटाने आपल्यामधून निवडून द्यावयाचे पंधरा वर्षापेक्षा कमी नसेल इतका अध्यापनाचा अनुभव असलेले, प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणारे दोन अध्यापक, त्यांपैकी एक अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातीची किंवा निरधिसूचित जमातीची (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमातीची किंवा इतर मागासवर्गाची व्यक्ती असेल, परंतु प्रत्येक विद्याशाखेचे आरक्षण हे चिट्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरवण्यात येईल.**

**परंतु, या खंडान्वये, प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अध्यापकांपैकी, एक अध्यापक ही, चिट्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरवण्यात येईल अशी महिला असेल.**

सन २०१७ च्या 'विद्यापरिषद- अध्यापक' निवडणुकीवेळी सोडत काढण्यात आली होती. काढलेल्या सोडतीनुसार विविध प्रवर्गासाठी खालीलप्रमाणे आरक्षण निश्चित करण्यात आले होते.

| **प्रवर्ग** | **विज्ञान व तंत्रज्ञान** | **वाणिज्य व व्यवस्थापन** | **मानवविज्ञान** | **आंतरविद्याशाखीय अभ्यास** |
|---|---|---|---|---|
| अ.जाती (SC) | | | २०१७ वेळी बिंदू आरक्षित. | |
| अ.जमाती (ST) | २०१७ वेळी बिंदू आरक्षित. | | | |
| वि.जा./भटक्या जमाती (VJ/NT) | | | | २०१७ वेळी बिंदू आरक्षित. |
| इतर मागास वर्ग (OBC) | | २०१७ वेळी बिंदू आरक्षित. | | |
| महिला (Women) | | | | २०१७ वेळी बिंदू आरक्षित. |
| खुला (Open) | १ | १ | १ | |
| **एकूण** | **२** | **२** | **२** | **२** |

सन २०१७ मध्ये ज्या विद्याशाखेसाठी जे प्रवर्ग सोडतीद्वारे आरक्षित झाले होते, त्या विद्याशाखेसाठी ते प्रवर्ग वगळून सोडतीचे आयोजन मा. कुलगुरू महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ०४-११-२०२२ रोजी दु. १२.३० वा. महात्मा फुले सभागृह, मुख्य प्रशासकीय इमारत येथे करण्यात आले आहे. सोडतीस उपस्थित राहण्यास इच्छुक असणाऱ्यांनी स्वखर्चाने उपस्थित रहावे.

कृपया सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

संदर्भ क्र. सा.प्र./निवडणूक/२०२२/446 )(
विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद )(
दिनांक- ०१-११-२०२२ )(

**कुलसचिव तथा**
**निवडणूक निर्णय अधिकारी**